सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.

१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर,
मुंबई–४०० ०१४

दूरध्वनि : ८८२०२३०   तारेचा पत्ता : बुकमार्क

●

एफ्–६, बँक ऑफ बरोडा बिल्डिंग, पार्लमेन्ट स्ट्रीट,
नवी दिल्ली–११० ००१

दूरध्वनि : ३१०१४१ □ ३१००८२

धी बुक सेन्टर लि. (मुद्रणालय विभाग) मुंबई–४०० ०२२

ग्रंथसूची

१९८२

सोमैया पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

कादंबरी

शिवकुमार जोशी अनुवादः श्रीपाद जोशी

आभाळाचे अश्रू

१९४१ ते १९५० या दशकाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कादंबरी. या कालखंडातील अनेक व्यथित करणाऱ्या घटनांचे, आक्रंदनाचे अलिप्तपणे केलेले चित्रण. गुजरात आणि बंगाल या दोन प्रांतांतील घटनांमधून सबंध भारताचे चित्र येथे साकारले आहे.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठेः ४९५ O मूल्यः रु. १५.००

शैलजा राजे

तुळशीपत्र

एका त्यागी आणि समर्पित स्त्री-जीवनाची अंतःकरण हेलावणारी ही कथा आहे. त्यागात आनंद मानणाऱ्या जीवनाची ही कहाणी प्रत्येक स्त्रीने वाचावी अशी आहे. सुबोध आणि भावनाशील शैलीने लिहिलेली ही कथा वाचताना असे वाटते की लेखिका त्या घराण्यात जणू स्वतः वावरलेली आहे.

आकारः क्राउन अष्टमांश O पृष्ठेः १६८ O मूल्यः रु. १५.००

शरच्चंद्र टोंगो

ही काही माणसं

लेखकाच्या अनुभवसंपन्न जीवनात त्याला भेटलेली ही काही माणसे. ही माणसे तुमच्याआमच्यासारखीच सामान्य माणसे आहेत. परंतु ती सामान्य आहेत म्हणूनच ती आपल्याला जवळची वाटतात.

कादंबरीच्या भाषेत कोठेही पाल्हाळ नाही. अलंकारिक भाषेचा सोस नाही. निसर्गवर्णनाची खैरात नाही. सरळ साधी भाषा, छोटी छोटी वाक्ये यांनी व्यक्ती आणि वातावरण यांचें जिवंत चित्र लेखक आपल्यापुढे उभे करतो.

आकारः क्राउन अष्टमांश O पृष्ठेः १५३ O मूल्यः रु. १४.००

कथासंग्रह

अरविंद गोखले

जत्रा

अरविंद गोखले यांनी १९५९ ते १९६३ या चार वर्षांत लिहिलेल्या कथांपैकी निवडक वीस कथा या पुस्तकात एकत्रित केलेल्या आहेत. परदेशप्रवासानिमित्त दीड-दोन वर्षे लेखणीला विराम दिल्यानंतर परत नव्या मनाने व नव्या जोमाने या कथा लिहिल्या गेल्या आहेत.

आकारः क्राउन अष्टमांश O पृष्ठेः २३१ O मूल्यः रु. ८.००

अरविंद गोखले

मुसळधार

गेल्या दोन तपांहूनही अधिक काळ मराठी कथासृष्टीतील आपले अग्रगण्य स्थान कायम ठेवून असणाऱ्या सदाबहार कथालेखकाच्या अलीकडील कथांचा हा संग्रह. प्रत्येक कथेच्या आरंभी तिची जन्म-कहाणी देण्याचा प्रयोग हे या कथासंग्रहाचे खास वैशिष्टच.

आकारः क्राउन अष्टमांश O पृष्ठेः १८४ O मूल्यः रु. ७.००

अरविंद गोखले

मुक्ता

अरविंद गोखले यांनी १९६५ ते १९७२ या आठ वर्षांत लिहिलेल्या कथांपैकी निवडक अठरा कथा या पुस्तकात एकत्रित केलेल्या आहेत.

अशा अग्रगण्य व अभिजात लेखकाच्या निवडक कथा या पुस्तकात वाचावयास मिळणे हेच रसिकांना कथासाहित्याचे मुक्तांगण !

आकारः क्राउन अष्टमांश O पृष्ठे २३४ O मूल्य रु. १६.००

लीला श्रीवास्तव

फाशी गेलेली उन्हे

लीला श्रीवास्तव यांच्या कथा म्हणजे प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित असं सजीव साहित्य. त्यांच्या कथांतून दारिद्र्य, दुराचार, वकाली जीवन यांचे उघडेनागडे दर्शन घडतं.

आकारः क्राउन अष्टमांश O पृष्ठेः १८४ O मूल्यः रु. ८.५०

विजया काळे

भरती

सहज एखादे बी मातीत रुजावे, सहजच त्याला कोंब फुटावा, बघता बघता तो मातीतून बाहेर पडावा, वर अंकुर यावा, पाने फुटावीत, म्हणता म्हणता रोप वाढीला लागावे, बहरावे अशीच, अगदी इतकी सहज विजया काळे यांची कथा विकास पावते. जिथे कथाबीज आढळणार नाही असे वाटते तिथेच नेमके त्या कसदार कथाबीज शोधून काढतात. त्यांच्या कथांमध्ये अनुभवांची अपूर्वाई जाणवते. अचूक मनोविश्लेषण, सूक्ष्म निरीक्षण व स्पष्ट रेखाटन यांमुळे सर्व कथा रेखीव.

आकार: क्राउन अष्टमांश O पृष्ठे: १५६ O मूल्य: रु. ८.००

मालती दांडेकर

आता फुलांनाच जपायचे

आटोपशीर कथानक, रोजच्या व्यवहारात आढळणारे प्रसंग आणि पात्रे व साधी ओघवती भाषा यामुळें मालतीबाईंच्या कथा वाचकांना सुरस कादंबऱ्यांइतक्याच आकर्षक वाटतात. उच्च व मध्यम पांढरपेशा वर्गाचे व त्यांच्या आचारविचारांचे यथातथ्य चित्रण त्यांच्या कथांत आढळते. स्त्रिया आणि त्यांची सुखदुःखे त्या अत्यंत आत्मीयतेने व उत्कटतेने रंगवितात.

आकार: क्राउन अष्टमांश O पृष्ठे: १९० O मूल्य: रु. ८.००

मालती दांडेकर

केशरपुष्प

प्राचीन युगापासून चालत आलेल्या लोककथांमध्ये आजच्या कथेचे कितीतरी गुण सामावलेले दिसतात. या लोककथासाहित्यातील काही मनोरंजक विषय निवडून घेऊन त्यांचेच दर्शन वाचकांना घडविण्याकरिता लिहिलेल्या ललित लेखांचा हा संग्रह आहे.

सतत पंचेचाळीस वर्षे कथालेखन करणाऱ्या सौ. मालतीबाईंच्या लेखांचा हा संग्रह म्हणजे मालतीबाईंच्या रसिक दृष्टीची व वृत्तीची सुखद प्रचीतीच होय.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १०९ O मूल्य: रु. १८.००

मोहर ○ मकरंद

अनुक्रमे १९६८ व १९६९ च्या दिवाळी अंकांतून 'महाराष्ट्र टाइम्स'-च्या वाचकांनी निवडलेल्या उत्कृष्ट कथा या दोन संग्रहांत समाविष्ट झाल्या आहेत.

रणजित देसाई, अरविंद गोखले, व. पु. काळे, पु. भा. भावे, ग. दि. माडगूळकर, सुमति क्षेत्रमाडे, शरच्चंद्र चिरमुले, जी. ए. कुलकर्णी, लीला श्रीवास्तव, इत्यादि बिनीच्या कथाकारांच्या निरनिराळ्या ढंगाच्या कथा असलेले हे वैशिष्टयपूर्ण कथासंग्रह. आजच्या मराठी कथेतील सर्व प्रवाहांचे प्रतिनिधित्व करणारे संग्रह.

मोहर—आकार: क्राउन अष्टमांश ○ पृष्ठे: २७९ ○ मूल्य: रु. ८.००
मकरंद—आकार: क्राउन अष्टमांश ○ पृष्ठे: १८६ ○ मूल्य: रु. ८.००

मुरलीधर कुलकर्णी

थोरला

"मुरलीधर कुलकर्णी या नव्या दमाच्या लेखकाचा हा नवा कथा-संग्रह. प्रादेशिक, विशेषत: वऱ्हाडी खेड्यांतील लोकांचे, त्यांच्या राहणीचे, त्यांच्या दैन्याचे, वैभवाचे, समस्यांचे, त्यांच्या बोलीभाषेत केलेले चित्रण हे या संग्रहाचे वैशिष्टय. . ."

आकार: क्राउन अष्टमांश ○ पृष्ठे: १४८ ○ मूल्य: रु. ५.००

—**लोकसत्ता**

सुभाष भेण्डे

जित्याची खोड

समाजाच्या विविध वृत्तींचे व प्रकृतीचे विडंबन हा भेण्डे यांच्या विनोदाचा स्थायीभाव आहे. सूक्ष्म निरीक्षण आणि त्यातून फुललेला विनोद यांमुळे डॉ. भेण्डे यांचा विनोद अभिजात आणि रंजक झाला आहे.
आकार: डेमी अष्टमांश ○ पृष्ठे: १३६ ○ मूल्य: रु. १६.००

सॉरी रॉंग नंबर

मुंबईच्या टेलिफोन कार्यालयात काम करणाऱ्या पाच तरुण लेखकांच्या निवडक नऊ कथांचा संग्रह. मध्यमवर्गीयांच्या आयुष्यांतील प्रसंग व समस्या यांवर या कथा आधारलेल्या असल्यामुळे त्या वाचकांना आवडतील अशाच आहेत.

आकार: क्राउन अष्टमांश ○ पृष्ठे: १२२ ○ मूल्य: रु. ६.००

नाटक एकांकिका

ग. दि. माडगूळकर

दोन नृत्यनाटिका 'कथा ही रामजानकीची' व 'शिवपार्वती'

"माडगूळकरांच्या पहिल्या नृत्यनाटिकेत तुलसीदासांचे कोमल पडसाद ऐकू येतात, तर दुसरीत कालिदासाचे. तथापि ते अगदी बारीक न कळत्या हुंकारासारखे. त्यामुळे त्यांना कोणताही जडपणा आलेला नाही. सर्वत्र सुगमपणा आणि कुशलता यांची हातगुंफणी चालू असल्या-प्रमाणे वाटते."

—अरविंद मंगरूळकर

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ६८ O मूल्य: रु. ६.००

ग. दि. माडगूळकर

गीतसौभद्र

"सुभद्रेच्या लग्नाची कथा अण्णा किर्लोस्करांनी 'सौभद्र' नाटकात सांगितली. अण्णा माडगूळकरांनी त्यातल्या गद्याचीही गीते केली आणि सौभद्राचे 'गीतसौभद्र' केले. . .किर्लोस्कर—माडगूळकरांच्या प्रति-भेचे कूळ एक असल्यामुळे इथे वडाची साल पिंपळाला लागली नाही. हे दोन प्रतिभांचे दोन ज्योतींसारखे मीलन आहे."

—पु. ल. देशपांडे (प्रस्तावना)

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ६५ O मूल्य: रु. ५.००

प्रा. श्री. र. भिडे, प्रा. व. दि. कुलकर्णी, प्रा. भालबा केळकर (संपादक)

एकांकिका वाटचाल

मराठी एकांकिका या वाङमय प्रकाराचा साकल्याने आढावा घेणारा हा पहिला ग्रंथ.

मराठी एकांकिकेच्या उगमापासून आजपर्यंतच्या म्हणजे गेल्या अडी-चशे वर्षांतील प्रातिनिधिक अशा सोळा एकांकिका येथे संग्रहित केल्या आहेत— 'श्री लक्ष्मीकल्याणनाटक' या आद्य एकांकिकेपासून पु. शि. रेगे यांच्या 'माधवी एक देणे' पर्यंत.

याशिवाय मराठी एकांकिकेचा उगम आणि विकास, तिचे स्वरूप आणि कार्य यांविषयी प्रदीर्घ अभ्यासपूर्ण प्रस्तावना आणि या संग्रहातील प्रत्येक एकांकिकेचे साहित्य-स्वरूप आणि निर्मिती-कल्पना स्पष्ट कर-णारी विस्तृत टिपणेही या ग्रंथात समाविष्ट आहेत.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ३३० O मूल्य: रु. १६.००

प्रा. श्री. र. भिडे संपादक

निवडक एकांकिका: १९६५

आणि

निवडक एकांकिका: १९६६

एक स्वतंत्र आणि प्रभावी कलाप्रकार म्हणून मराठी एकांकिका आपले महत्त्व प्रस्थापित करू लागली आहे. दरवर्षी मराठी भाषेत कितीतरी दर्जेदार एकांकिका प्रसिद्ध होतात. प्रयोगक्षमता व साहित्य गुण असलेल्या निवडक एकांकिका आणि त्या त्या वर्षात प्रकाशित झालेल्या सर्व एकांकिकांची सविस्तर सूची या दोन संग्रहांत समाविष्ट करण्यात आली आहे. साहित्याचे अभ्यासक आणि नाट्यरसिक यांना अत्यंत उपयुक्त संग्रह.

निवडक एकांकिका: १९६५

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: २८४ O मूल्य: रु. १२.००

निवडक एकांकिका: १९६६

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: २४४ O मूल्य: रु. १२.००

नानासाहेब फाटक

स्मृतिसुगंध

हॅम्लेट, वृंदावन, सुधाकर, राघोबादादा, झुंझारराव इत्यादी अनेक भूमिका गेली पन्नास वर्षे गाजविणारे मराठी रंगभूमीचे तपोवृद्ध नट-श्रेष्ठ श्री. नानासाहेब फाटक यांनी आपल्या अनुभव-संपन्न आयुष्यात जे जे पाहिले व अनुभवले त्याची या पुस्तकात रसिक वृत्तीने आणि सहृदयतेने चिकित्सा केली आहे. या नटश्रेष्ठाने या पुस्तकात आळविलेल्या आठवणी म्हणजे त्याच्या आयुष्याचा ताळेबंदच.

आकार: क्राउन अष्टमांश O पृष्ठे: १८० O मूल्य: रु. ७.५०

मेजर रा. गो. साळवी

स्वाधीन की दैवाधीन

दुसऱ्या महायुद्धात मेजर साळवी मध्यपूर्वेतील रणांगणावर गेले. टोब्रुकच्या वेढ्यात त्यांना युद्धबंदी म्हणून अटक झाली. जर्मनांच्या कैदेत एक वर्ष काढल्यानंतर त्यांनी कैद्यांच्या छावणीतून आपली सुटका करून घेतली व इटालियनांच्या साह्याने मुक्त होऊन स्वदेशी परत आले. या काळात त्यांनी सेनाधिकारी आणि युद्धबंदी अशा दोन्ही नात्यांनी जी साहसे केली आणि संकटे भोगली त्यांचे अत्यंत रोमांचकारी शद्बचित्र या पुस्तकात रेखाटले आहे.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १४७ O मूल्य: रु. ३.५०

द. म. सुतार

प्रासाद आम्हा बंदीशाळा

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा सविस्तर आणि सर्वांगीण इतिहास सिद्ध होण्यासाठी त्या लढ्यात भाग घेतलेल्या लहानथोर कार्यकर्त्यांचे अनुभव या पुस्तकात ग्रथित झाले आहेत. फुलांची आवड, कष्ट करण्याची तयारी, इतरांना आनंद देण्याची हौस आणि चहाप्रेम यासंबंधीच्या हकीकतींमुळे ही स्मृतिचित्रे मनोज्ञ झाली आहेत.

आकार: क्राउन अष्टमांश O पृष्ठे: १८० O मूल्य: रु. ५.००

प्रबोधनकार ठाकरे

माझी जीवनगाथा

"महाराष्ट्रभूषण प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे म्हणजे एक बहुरंगी, बहुढंगी नि बहुरूपी कर्तुत्ववान पुरुष. अशा ह्या महाभागाच्या गतिशील जीवनात अनेक संघर्ष नि संगर झाले. त्यांना निधडेपणाने तोंड देऊन त्यांवर त्यांनी जी मात केली, त्याचे ठसठशीत, रसरशीत नि प्रभावी कथन करणारी ही 'जीवनगाथा' आहे. गोव्यापासून नागपूरपर्यंत सर्व महाराष्ट्र पायाखाली घालून महाराष्ट्रातील समाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण केलेल्या महाराष्ट्राच्या एका पराक्रमी पुत्राच्या ह्या आठवणी आहेत."

–धनंजय कीर

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ४९१ + आर्ट पेपरवरील वीस छायाचित्रे

मूल्य: कापडी बांधणी रु. ३५.०० कागदी बांधणी रु. १५.००

इंदिरा गांधी

स्वप्नसिद्धीची दहा वर्षे

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या निवडक लेखांचा आणि भाषणांचा हा प्रातिनिधिक संग्रह त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांचा दृष्टिकोन, त्यांची विचारधारा यांचे सम्यक् दर्शन घडविणारा आहे. श्रीमती गांधींच्या आयुष्यात ज्या लहानमोठ्या घटना घडल्या आणि त्यांच्या मनात क्रिया प्रतिक्रियांचे जे तरंग उठले, त्यांचे प्रतिबिंब या संग्रहाच्या पानापानावर उमटले आहे.

या दशकाच्या कालखंडात कितीतरी महत्वपूर्ण घटना देशात आणि परदेशात घडल्या आहेत. या घटना त्यांनी ज्या कौशल्याने हाताळल्या त्यातून त्यांची श्रेष्ठ दर्जाची मुत्सद्देगिरी आणि अचूक निर्णय घेण्याची क्षमता जगाला कशी दिसली याची कल्पना त्या त्या प्रसंगी त्यांनी जी भूमिका घेतली त्यावरून स्पष्ट होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या एका असामान्य तेजस्वी पैलूंचे दर्शन घडते.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ३५२ + आर्टपेपरवरील १६ पानी छायाचित्रे

कापडी बांधणी: रु. ४०.००
कागदी बांधणी: रु. २०.००

प्रभाकर माचवे

जगजीवनराम : व्यक्ती आणि विचार

श्री. जगजीवनराम यांनी श्रम, दळणवळण, रेल्वे, संरक्षण, कृषी अशा अनेक खात्यांतून मोलाची राष्ट्रसेवा केली. त्याचे कारण ते अत्यंत गरीब व मागासलेल्या जमातीतून वर आले असले तरी राष्ट्रीय लढ्याच्या मुख्य धारेला त्यांनी एकनिष्ठेने स्वतःला वाहून घेतले. हा त्यांचा जीवनालेख, भारतातील समता व विषमता आणि याचप्रमाणे बिहारच्या राष्ट्रीय व सामाजिक इतिहासाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत परिश्रमपूर्वक व वस्तुनिष्ठ दृष्टीने या पुस्तकात अंकित करण्याचा प्रयत्न केला आहे. बाबूजींबद्दल देशातील व परदेशातील माननीय व्यक्तींचे विचार, अभिप्राय व मंगल आशिर्वादही येथे ग्रथित केले आहेत.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: २१४+ आर्टपेपरवरील ८ पानी छायाचित्रे

कागदी बांधणी: रु. १०.००

मनोहर सरदेसाई

आभाळाचे मन

स्वतंत्र गोमंतकाचे पहिले मुख्यमंत्री श्री. दयानंद (भाऊसाहेब) बांदोडकर हे एक अद्वितीय नेते होऊन गेले. दानशूरता, निर्भयपणा, शिस्तीबद्दल आवड, शिक्षणाबद्दलची आस्था, गरिबांबद्दल कळकळ वगैरे त्यांच्या स्वभावाचे पैलू दाखविणाऱ्या त्यांच्या आयुष्यातील घटनांचे यांत आकर्षक भाषेत वर्णन करून सांगितले आहे.

किशोर वाचकांना हे पुस्तक फारच उद्‌बोधक वाटेल.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ६८ O मूल्य: रु. ३.७५

संकीर्ण

प्रभाकर अत्रे

कथा सृजनाची

पु. भा. भावे, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, श्री. ना. पेंडसे, बा. भ. बोरकर इत्यादी दहा नामवंत साहित्यिकांच्या 'साहित्यनिर्मिती' या विषयावरील सविस्तर, उद्बोधक व मनोरंजक मुलाखती, प्रत्येक साहित्यिकाचा कर्तुत्वालेख आणि त्याच्या हस्ताक्षराचा नमुना या पुस्तकात समाविष्ट आहेत.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १५९ O मूल्य: रु. १०.००

ज. द. जोगळेकर

भारताची युद्धशास्त्राची उपेक्षा

"श्री. ज. द. जोगळेकर यांनी प्रस्तुतचा प्रबंध लिहून मराठी भाषेत युद्धशास्त्राविषयी जी हाताच्या बोटांवर मोजता येण्याजोगी पुस्तके आहेत त्यामध्ये एका मोलाच्या पुस्तकाची भर घातली आहे. त्यांनी जो विषय निवडला आहे तो अत्यंत महत्त्वाचा पण त्याचबरोबर अतिशय अप्रिय वाटणारा आहे. कारण तो कटू आहे. . ."

—**ना. ग. गोरे** (प्रस्तावना)

आकार : **डेमी** अष्टमांश O पृष्ठे: १२० O मूल्य: रु. १०.५०

सुधाकर राजे

वेगळे जग

विज्ञान, निसर्ग, साहस, गुन्हेगारी, अतींदिय अनुभव, इत्यादि विषयांमधील अनेक रोमांचकारी, सुरस व चित्तचक्षुचमत्कारिक अनुभवांनी समृद्ध असलेल्या नव्या व निवडक इंग्रजी पुस्तकांच्या 'वेगळ्या जगा'चा परिचय करून देणारे हे पुस्तक वाचकाने हातात घेतल्यानंतर पूर्ण वाचूनच तो ते खाली ठेवतो.

आकार: क्राउन अष्टमांश ○ पृष्ठे: १९७ ○ मूल्य: रु. ७.००

ज. द. जोगळेकर

अमेरिकन क्रांती

अमेरिकेचा शोध लागला येथपासून सुरवात करुन तेथे वसाहती कशा वसल्या, त्यांचा मायदेशाशी कसा वाद सुरू झाला, त्या वादाचे पर्यवसान युद्धात होऊन त्या युद्धाचे अखेरीस अमेरिका कशी स्वतंत्र झाली त्या क्षणापर्यंतची कथा सांगितली आहे. या क्रांतीत घडलेल्या रोमांचकारी घटना, तिने निर्माण केलेली विचारसंपदा, त्यांतील समर-प्रसंग व त्या समरप्रसंगातले सेनानी यांच्याविषयींची माहिती ऐतिहासिक घटनांशी प्रामाणिक राहून पण नाटचमय पद्धतीने सांगितली आहे. इतका विस्तृत काळ नि त्या काळातील नाटचमय घटना इतक्या मोजक्या शब्दांत सांगणारा मराठीतील पहिला ग्रंथ.

आकार: डेमी अष्टमांश ○ पृष्ठे : २२४ ○ कापडी बांधणी: रु. ३५.००
कागदी बांधणी रु. २५.००

प्रा. दु. पां. कुळकर्णी
डॉ. बा. र. रायरीकर

लॉर्ड केन्स : व्यक्ति आणि विचार

प्रचलित सिद्धांताला धक्का देणारी नवी शास्त्रीय कल्पना मांडणाऱ्या क्रांतिकारी प्रवृत्तीच्या विचारवंतांत केन्सची गणना होते. अशा थोर अर्थशास्त्रज्ञाच्या व्यक्तिमत्वाचा आणि विचारांचा थोडक्यात परिचय ग्रंथकर्त्यांनी या छोटचा पुस्तकात मराठी वाचकांना करून दिला आहे.

"सत्यासाठी झगडणारा शिलेदार" असे केन्सचे अगदी समर्पक वर्णन ग्रंथकर्त्यांनी एका प्रकरणात केले आहे. हे अल्प चरित्र सर्वसमावेशक आहे हे त्याचे वैशिष्टय. केन्सच्या व्यक्तिमत्वाचे कितीतरी पैलू वाचकांना या छोटया पुस्तकात दिसतील.

अर्थशास्त्राशी परिचय असलेल्या कोणत्याही व्यक्तीला हे चरित्र आकर्षून घेईल यात शंका नाही. पण हे चरित्र-विषय झालेल्या व्यक्तीच्या जीवनातच मुळी इतकी विविधता आहे की हे चरित्र कोणालाही स्फूर्तिस्थान वाटावे.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठेः ८८ O कागदी बांधणी मूल्यः रु ८.००

रमेश काणकोणकर

सर्प परिचय

सर्पाविषयीच्या अनेक शंकांचे निरसन करणारी मनोरंजक माहिती या पुस्तकात साध्या व सोप्या भाषेत दिली आहे. योग्य त्या ठिकाणी सुरेख आकृत्या दिल्या आहेत.

सर्पदंशाचे निदान, ते टाळावेत कसे आणि प्रथमोपचार यांसंबंधी सांगोपांग व शास्त्रशुद्ध माहिती दिली आहे.

श्री. काणकोणकर हे मुंबईतील ख्यातनाम हाफकिन संस्थेत वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी असून, सर्पविष हा त्यांचा संशोधन-विषय आहे.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठेः १२४ O मूल्यः रु. १७.००

वसंत शांताराम देसाई

किर्लोस्कर आणि देवल

किर्लोस्कर आणि देवल यांच्यासारखी गुरुशिष्याची जोडी मराठी नाटचसृष्टीत अद्यापि झाली नाही. १८८० ते १९०० या कालखंडात या गुरुशिष्यांच्या कार्याच्या परस्परपूरक प्रवाहाने आधुनिक मराठी रंगभूमीची जडणघडण झाली. अभिजातता, काव्यात्मकता, रसिकता आणि संपूर्ण संगीतमयता यांची बैठक मराठी रंगभूमीवर याच गुरुशिष्यांनी पसरली. देवलांनी शिकवून तयार केलेल्या नटांमुळे नाटचशिक्षणाची एक परंपरा निर्माण झाली. किर्लोस्करांच्या व देवल यांच्या कलाजीवनांचेही दर्शन घडविले आहे.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठेः १६५ O मूल्यः रु. २०.००

वसंत शांताराम देसाई

गडकऱ्यांची नाट्यसृष्टी

गडकऱ्यांचे शेवटचे नाटक रंगभूमीवर येऊन आता साठ वर्षे लोटली असल्यामुळे त्यांच्या नाटकांविषयी समतोलपणे विचार करणे आता शक्य आहे. गडकऱ्यांनी चार नाटके लिहिली व पाचवे 'राजसंन्यास' अपूर्ण राहिले. या चार नाटकांचा विचार व 'राजसंन्यास' या नाटकातील भाषेचा विचार या पुस्तकात केला आहे.

श्री. देसाई यांच्यासारख्या नाट्यशास्त्रांतील अधिकारी समीक्षकाने लिहिलेले हे पुस्तक प्राध्यापक, विद्यार्थी व नाट्यप्रेमी वाचक यांना फारच उद्बोधक वाटेल.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १८८ O मूल्य: रु. २४.००

किशोर वाङ्मय

बाबुराव सावे

निसर्गाच्या प्रांगणात : पक्षी

अगदी सोप्या, जिव्हाळ्याच्या भाषेत चाळीसहून अधिक पक्ष्यांची ओळख करून दिली आहे. मोठा टाईप आणि खूप सुंदर चित्रे असलेल्या या पुस्तकाने नऊ ते चौदा वर्षांच्या मुलांना निसर्गाचे निरीक्षण करण्याचा छंद जडेल, त्यांची जिज्ञासू वृत्ती वाढेल.

महाराष्ट्र सरकारचे बालवाङ्मयाचे खास पारितोषिक या पुस्तकाला मिळाले आहे.

आकार: क्राउन चतुर्थांश O पृष्ठे: ४४ O मूल्य: रु. २.५०

'उद्याचे नागरिक' पुस्तकमाला

भारताचे तत्कालीन शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुण सेन यांनी ६ ऑक्टोबर १९६७ या दिवशी या पुस्तकमालेचे उद्घाटन केले. विज्ञान व तंत्रज्ञान यांची मुख्य तत्त्वे, त्यांचे व्यावहारिक उपयोग, जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ, आपल्या शेजारचे देश, निरनिराळे व्यवसाय, वगैरे विषयांची शालेय विद्यार्थ्यांना ओळख करून द्यावी हा या पुस्तकमालेचा उद्देश आहे. ही पुस्तके मोठ्या टाइपांत छापली असून त्यांत सुंदर रंगीत चित्रेही भरपूर प्रमाणात आहेत, शिवाय ती तज्ज्ञांनी साध्या व आकर्षक भाषेत लिहिली आहेत. या पुस्तकांनी मुलांचा शाळेतील अभ्यास सोपा व मनोरंजक होईल.

***१. चराचरांना पृथ्वी ओढी** : सोली पावरी, रसिक शाह

न्यूटनपासून आइन्स्टिनपर्यंत ३०० वर्षांचे अंतर असले तरी इथे ते फक्त ३२ पानांचे अंतर आहे. पृथ्वीवरील आणि अवकाशातील गुरुत्वाकर्षणासंबंधीच्या सिद्धांताचे विवरण सोप्या भाषेत आणि भरपूर चित्रांच्या साहाय्याने केले आहे.

*सध्या उपलब्ध नाही.

***२. आपले पूर्वज कोण ? :** रसिक शाह

माणूस माकडाचा वंशज आहे हा सिद्धांत चूक आहे, हे या पुस्तकात सिद्ध केले आहे. सहज पटेल अशा तऱ्हेने लॅमार्क आणि डार्विन यांचे सिद्धांत ओघवत्या भाषेत सांगितले आहेत. शिवाय चित्रेही हे सिद्धात समजावून देतात. उत्क्रांती म्हणजे काय हे ज्यांना जाणून घ्यावयाचे असेल त्या मुलांना हे पुस्तक खूपच आवडेल.

***३. आपले सूक्ष्म शत्रू आणि मित्र :** सोली पावरी

पूर्वी ज्यांनी हजारो माणसांच्या आरोग्याचा बळी घेतला त्या अगदी लहानसहान प्राण्यांची ही सचित्र कहाणी. पण हेच सूक्ष्म जंतू माणसाचे मित्रही आहेत. त्यांचा शोध कसा लागला, त्यांचे प्रकार किती, ते माणसांना कसे घातक आहेत आणि कसे उपकारक आहेत याची मूलभूत माहिती या पुस्तकात मिळेल.

***४. सामर्थ्यवान परमाणू :** रसिक शाह

हिरोशिमा आणि नागासाकी या ठिकाणी झालेल्या उत्पातामागील शक्तीचा उपयोग माणसाच्या सुखासाठीही करता येतो, हे या छोट्या पुस्तकात दाखवून दिले आहे. परमाणूची घटना, त्याचा इतिहास, क्यूरी दांपत्याला लागलेला रेडियमचा शोध, परमाणु युगात किरणोत्सर्गाचे महत्त्व, यांची ओळख या पुस्तकात होते.

***५. विज्ञानाचे मार्गदर्शक–१. लुई पाश्चर :** इवाँ फेटस

माणसाला हरघडी उपयोगी पडणारे अनेक शोध लावून ज्याने फ्रान्स देशाची प्रतिष्ठा वाढविली त्या लुई पाश्चरची ही जीवनकहाणी. 'पाश्चरीकरण' केलेल्या दुधाची बाटली हातात धरणाऱ्या प्रत्येक गृहिणीने आणि कुत्र्याची खोडी काढल्यानंतर ज्याला कुत्रा चावला आहे अशा प्रत्येक मुलाने पाश्चरची आठवण ठेवली पाहिजे.

***६. लाल रंग हा रक्ताचा :** रसिक शाह

रक्त म्हणजे काय आणि रक्ताचे कार्य काय याची अचूक कल्पना या पुस्तकावरून येते. रक्ताचे अभिसरण आणि राजमार्ग व छोटे रस्ते यांवरून होणारी मालाची वाहतूक यांची तुलना खरोखरच मजेदार आहे.

७. आपले आशियाई बंधू—१. इराण : बानू गोंडा

कोणताही हौशी प्रवासी लहान मुलाला इराणचा कानाकोपरा दाखवून आणू शकत नाही, पण हे पुस्तक मात्र त्याला सबंध इराणची सहल घडविते. इराणचा इतिहास, भूगोल, लोक, त्यांची जीवनपद्धती यांचे दर्शन या पुस्तकात घडते.

८. देशांचे रखवालदार : सोली पावरी, पेरिन आदरियनवाला

एका कुटुंबातील माणसे आणि देशाचे रक्षण करणाऱ्या दलांचे प्रतिनिधी यांच्यातील हा संवाद. पोलिस आणि सैन्यदल यांत कर्तृत्वाला भरपूर वाव आहे याकडे मुलांचे जास्त लक्ष जायला पाहिजे. पोलिसांच्या कर्तव्यनिष्ठेची आणि परमवीर चक्र मिळविणाऱ्या सैनिकांच्या शौर्याची गाथा वाचून प्रत्येक बालवाचक रोमहर्षित होतो.

९. चला सूर्याकडे : रजनीकांत मोदी

या पुस्तकाच्या साहाय्याने लहान मुले अंतराळाची—चंद्र, शुक्र, बुध यांची—सहल करू शकतात आणि सूर्याचे जवळून दर्शन घेऊ शकतात ! एक उत्कृष्ट विज्ञान-काल्पनिका (सायन्स-फिक्शन). यात पंखयंत्र, चित्रध्वनिवाहक नावाची यंत्रे, शांतिनिद्रा नावाच्या गोळ्या अशा अनेक कल्पनारम्य गोष्टी आहेत.

१०. आपली नैसर्गिक घोंगडी : रजनीकांत मोदी

आपले शरीर नेहमी 'एअर कंडिशन्ड' ठेवणाऱ्या त्वचेसंबंधी हे पुस्तक आहे. त्वचा म्हणजे कुठेही शिवण नसलेला सदरा. त्वचेची घटना, कार्य, त्वचांतर (स्किन ग्रॅफ्टिंग), त्वचा पेटी (स्किन बँक), त्वचा संवर्धन (कल्टिव्हेटिंग दि स्किन) आणि प्लॅस्टिक शस्त्रक्रिया (कॉस्मेटिक किंवा करेक्टिव्ह सर्जरी) यासंबंधी अद्यावत शरीरशास्त्रीय माहिती या पुस्तकात सोप्या भाषेत दिली आहे.

११. विज्ञानाचे मार्गदर्शक—२ हाफकिन : ह. ई. झाला

पृथ्वीवरील माणसांच्या संख्येपेक्षा दसपट संख्येने असलेले उंदीर हे अन्नधान्य तर खातातच; शिवाय ते महामारी (प्लेग) पसरवितात. महामारी व पटकी (कॉलरा) या भयानक रोगांवर हाफकिनने कसा विजय मिळविला त्याची ही कथा. सुप्रसिद्ध हाफकिन इन्स्टिटयूटच्या संचालकांनीच लिहिलेली.

१२. घरकुलात वीज : विनोद प्रकाश

विजेविषयी सर्व मुलांना कुतूहल वाटत असते. विजेचा प्रवाह म्हणजे आहे तरी काय ? वीज, विजेची उपकरणे, ती वापरण्याची पद्धत यासंबंधी अत्यंत प्राथमिक माहिती या पुस्तकात मिळेल.

१३. अन्नाचा प्रवास : डॉ. सौ. सत्यवती सिरसाट

जीवनसत्त्वे म्हणजे काय, कोणत्या पदार्थांमध्ये कोणती जीवनसत्त्वे असतात, आपण खाल्लेल्या पदार्थांचा प्रवास शरीराच्या निरनिराळ्या भागांतून कसा होतो, त्या भागांमध्ये अन्नावर कोणते संस्कार होतात, अन्नामुळे शक्ती निर्माण होऊन आपली वाढ कशी होते, या सर्व प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात मिळतात.

१४. आपले आशियाई बंधु - ब्रह्मदेश : बानू गोंडा

ब्रह्मदेश म्हणजे तेथील पगोडे, जंगले, तांदूळ, तेल, चिरूट व स्त्रियांनी चालविलेली दुकाने यांची आपल्याला आठवण होते.

ब्रह्मदेश बरीच वर्षे भारताचा एक भाग होता आणि भारताचा शेजारी असूनही तेथील समाज जनता चालरीती, भाषा, धार्मिक व सामाजिक चालीरीती आपल्यापासून पूर्णपणे भिन्न आहेत. अशा देशा-बद्दलची माहिती आपल्या मुलांना मनोरंजक व उद्‌बोधक वाटेल अशा रीतीने हे पुस्तक लिहिले आहे.

१५. देशाचे शिल्पकार : सोली पादरी, पेरिन आदरियनवाला

अजून बरेचदा आपले पालकच त्यांच्या मुलाने कोणता व्यवसाय निवडावा, हे ठरवितात. कोणकोणते व्यवसाय उपलब्ध आहेत याची माहिती मुलांना देऊन आणि मुलाचा कोठे कल आहे, हे पाहूनच त्याचा व्यवसाय निवडण्यात त्याला मदत करायला हवी. वैद्यकीय, अभि-यांत्रिक, हिशेबनीस, प्रवासी मार्गदर्शक अशा विविध व्यवसायांची ओळख या पुस्तकात करून दिली आहे.

१६. चला चंद्रावर स्वारी करूया : चिं. श्री. कर्वे

निंबोणीच्या झाडामागे दडून बसलेल्या चांदोबाला माणसाने शेवटी कसे गाठले याची रोमहर्षक वैज्ञानिक सत्यकथा. सोळाव्या शतकात गॅलिलिओने दुर्बिणीतून घेतलेल्या चंद्रदर्शनापासून 'अपोलो–११' यानातून माणसाने केलेल्या चंद्रावरील स्वारीपर्यंतचे अविरत प्रयत्न, अग्निबाण, अवकाशयान, यांची कार्यपद्धती याविषयी मनोरंजक माहिती.

२१–२२. आकाशमंडप (भाग १ व २): बाबूराव सावे

चंद्राची आपल्याला आता चांगलीच ओळख झाली आहे. पण चंद्राशिवाय या अनंत अवकाशामध्ये अगणित ग्रह, तारे व नक्षत्रे दिसतात. ध्रुव, शर्मिष्ठा, सप्तर्षि, रोहिणी, पुनर्वसु, चित्रा, स्वाती, मंगळ, शुक्र, इत्यादि मंडळींची तोंडओळख या पुस्तकात होईल आणि बालवाचकांना आकाशमंडपाचे निरीक्षण करण्याचा छंद जडेल.

बंगाली, मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि संस्कृत या भाषांमध्ये उपलब्ध.

क्रमांक १ ते १२ : प्रत्येकी रु. १–८० व क्रमांक १३, १५, १६ २१ व २२: प्रत्येकी रु. २–००.

बाल वाङ्मय

राजा मंगळवेढेकर

अगडं बगडं

शैलजाराजे, राजा मंगळवेढेकर, वसुधा पाटील, शरच्चंद्र बडोदेकर

अंगत पंगत

चिमणी, ससा, मनी, मोत्या, मोर, फुगा, सर्कस, अशा बाळगोपाळांच्या ओळखीच्या विषयांवरची गाणी या दोन छोट्या पुस्तकांत आहेत. एखादे निरर्थक बडबडगाणेही आहे. या गाण्यांत अगदी मजेदार आणि मुलांना आवडतील अशा कल्पना आहेत, नादमाधुर्य आहे. चालीवर आणि हावभाव करून म्हणता येतील अशी ही गाणी आहेत. छोट्या मुलांना खिळवून ठेवतील अशी छान छान चित्रे प्रत्येक गाण्यासोबत आहेत. एरवीपेक्षा वेगळ्या आकारातील ही पुस्तके मोठ्या अक्षरात छापली आहेत.

अगडं बगडं	पृष्ठे: १६	मूल्य: रु. १.००
अंगत पंगत	पृष्ठे: २४	मूल्य: रु. १.००

आवडत्या कथा पुस्तकमाला

पाच ते नऊ वर्षांच्या मुलांचे मनोरंजन व्हावे आणि त्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी मुद्दाम ही पुस्तके तयार केली आहेत. मुलांमध्ये प्रिय झालेल्या भा. रा. भागवत, लीलाधर हेगडे यांच्यासारख्या लेखकांनी या चटकदार गोष्टी लिहिल्या आहेत. मजेदार कल्पना, सोपी, साधी भाषा, मोठा टाइप आणि भरपूर रंगीत चित्रे यांमुळे ही पुस्तके मुलांना खूप आवडतात. या पुस्तकमालेचा संच म्हणजे वाढदिवसाची आदर्श भेट.

या मालेतील 'खाशी जिरली वाघोबाची' आणि 'मनी हरवली, मनी सापडली' या पुस्तकांना महाराष्ट्र सरकारची बालवाङ्मयाची पारितोषिके मिळाली आहेत.

१. **ससाची फजिती** : लीलाधर हेगडे
२. **कोल्होबाची चंगळ** : श्रीकृष्ण गंधे
३. **झाडाला जेव्हा पैसे लागतात** : तु. मो. साळी
४. **खाशी जिरली वाघोबाची** : भा. रा. भागवत
५. **जादूची पिशवी** : भा.रा भागवत
६. **शेपटी अर्धी, त्यात दिवाळीची गर्दी** : शैलजा राजे
७. **कोल्होबा जिंकले, कोल्होबा हरले** : शरच्चंद्र बडोदेकर
८. **पारिजातक** : वसंत शिरवाडकर
९. **मच्छरी शेटजी खीर खातात** : भा. रा. भागवत
१०. **पराक्रमी इटकु पिटकु** : शैलजा राजे
११. **इटकु पिटकूची सहल** : शैलजा राजे
१२. **मनी हरवली, मनी सापडली** : लीलाधर हेगडे

क्र. १, ३, ४, १२ O पृष्ठे : २४ O मूल्य : रु. १.००
क्र. २, व ५ ते ११ O पृष्ठे १२ O मूल्य : पैसे ५०

संस्कृत

वा. दि. गांगल

भर्तृहरीयम्

शतकत्रयाचा कर्ता राजा भर्तृहरी नीतीकडून शृंगाराकडे आणि शृंगाराकडून वैराग्याकडे कसा वळला याचा शोध घेणारे त्याच्या जीवनावर आधारित नवे संस्कृत नाटक. नाट्यतंत्राच्या जुन्या व नव्या नियमांचा संगम साधून लिहिलेले. त्यात दुर्बोध शब्द नाहीत, दीर्घ समास नाहीत. त्यात प्रसादगुण असल्याची ग्वाही तर श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर यांनी प्रस्तावनेत दिली आहे.

आकार : डेमी अष्टमांश O पृष्ठे: ५२ O मूल्य: रु. ५.००

पाठ्यपुस्तके

प्रा. श्री. र. भिडे संपादक

नल-दमयंती स्वयंवर

शिवकालाच्या उत्तरार्धातील एक प्रमुख आख्यानक कवी रघुनाथ पंडित याच्या या आख्यानाला श्रीहर्षाच्या नैषधचरिताचा आधार असला, तरी ते संस्कृतचा निव्वळ अनुवाद नव्हे. रघुनाथ पंडिताच्या स्वतंत्र प्रज्ञेच्या विलासाचे वैशिष्ट्य पटविणारी अनेक आकर्षक स्थळे या काव्यात आढळतात.

या महाविद्यालयीन आवृत्तीसाठी नवनीतकारांची संहिता प्रमाण मानण्यात आली आहे. या आवृत्तीत मूळ पद्य, त्याखाली कठीण शब्दांचे अर्थ, महत्त्वाच्या शब्दांवर विस्तृत टीपा आणि संबंधित पद्यांतील अलंकार असा क्रम ठेवला आहे. याशिवाय तीन परिशिष्टे आणि प्रदीर्घ प्रस्तावना आहे. पहिल्या परिशिष्टात नवनीतकारांच्या संहितेत नसलेली ४० प्रक्षिप्त पद्ये, शब्दार्थ, टिपा व अलंकार दिले आहेत. दुसऱ्या परिशिष्टात संहितेतील पद्यांमध्ये आलेल्या अलंकारांचे तपशीलवार विवेचन केले आहे. तिसऱ्या परिशिष्टात संहितेमध्ये आलेल्या वीस वृत्तांची ओळख करून दिली आहे. छत्तीस पानी प्रस्तावनेत मराठी आख्यानक कवितेची उत्पत्ती व इतिहास, रघुनाथ पंडिताचे चरित्र, आख्यानाचा रचनाकाल, कथानक, रस, भाषाशैली इत्यादी मुद्यांचा सांगोपांग उहापोह केला असून नल, दमयंती व हंस यांची व्यक्तिचित्रेही रेखाटली आहेत.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १४० O मूल्य: रु. ६.००

शाम पिटके

विद्युत्यशोदीप

या पुस्तकात विजेची उपकरणे, वायरिंगच्या पद्धती, विजेची कामे करताना पाळावयाचे सुरक्षिततेचे नियम, प्रथमोपचार इत्यादि इलेक्ट्रिशियनच्या व्यवसायाशी आणि त्याच्या अभ्यासक्रमाशी संबंधित अशा सर्व गोष्टीचे मुद्देसूद विवेचन सोप्या भाषेत केलेले आहे. सोबत सुमारे शंभर आकृत्या असल्याने हे विवेचन अधिकच सुबोध झाले आहे. यात इंडियन इलेक्ट्रिसिटी रूल्स दिले असून आय्. एस्. आय्. ची चिन्हे वापरली आहेत. विजेची कामे करताना कामगार नेहमी ज्या चुका करण्याची शक्यता असते त्या चुका टाळण्यासाठी उपयुक्त सूचनाही दिल्या आहेत.

या पुस्तकातील प्रकरणे: (१) सुरक्षिततेचे नियम; (२) प्रथमोपचार; (३) उपयुक्त हत्यारे; (४) विद्युत् साधने; (५) विद्युत् प्रवाह; (६) विद्युत् मंडल; (७) वायरिंग करण्याच्या विविध पद्धती; (८) केबल्स; (९) जॉइंटिंग आणि सोल्डरिंग; (१०) विद्युत्वाहक आणि विद्युत्विरोधक; (११) डी. सी. यंत्रे; (१२) ए. सी. यंत्रे; (१३) प्रकाश; (१४) विद्युतमापके; (१५) विजेचे वाहन आणि वाटप; (१६) लिफ्ट; (१७) इंडियन इलेक्ट्रिसिटीचे नियम; (१८) प्रयोग; (१९) उपयुक्त कोष्टके.

पी. डब्ल्यू. डी. सेकंड क्लास वायरमन, आय्. टी. आय. वायरमन, आय. टी. आय. इलेक्ट्रिशियन, इत्यादि अभ्यासक्रम करणाऱ्या तसेच नॅशनल अॅप्रेंटिस परीक्षेस किंवा तांत्रिक विषय घेऊन शालांत परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त पुस्तक.

पुस्तकाचे लेखक श्री. शाम पिटके महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण मंडळात सिनियर इन्स्ट्रक्टर (इलेक्ट्रिकल) म्हणून अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

आकार: डेमी अष्टमांश ○ पृष्ठे: १६४ ○ मूल्य: रु. ~~५.००~~ १२.००

प्रा. प्र. गं. मुळे

लोकप्रशासनाची मूलतत्वे

मराठी माध्यमातून राज्यशास्त्राचा पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लोकप्रशासनाच्या सर्व अंगोपांगांचे विस्तृत विवेचन या पुस्तकात केले आहे. संघटनेचे तत्त्व (Organization), पंक्तिघटक (Line Agencies), नोकरव्यवस्था (Personnel Administration) प्रशासकीय सत्ता (Administrative Power) आणि प्रशासकीय जबाबदारी (Administrative Responsibility) या व इतर अनेक महत्त्वाच्या मुद्यांचे भारतीय लोकप्रशासनाच्या संदर्भात विस्तृत व चिकित्सक विवेचन हे ह्या पुस्तकाचे खास वैशिष्टच आहे. इंग्रजी संज्ञांना सोपे मराठी पर्याय वापरले आहेत व पारिभाषिक शद्बांची सूचीही दिली आहे.

या पुस्तकातील प्रकरणे: (१) लोकप्रशासनाचे स्वरूप; (२) संघटना: स्वरूप व तत्त्वे; (३) लोकप्रशासनाचा प्रमुख प्रशासक; (४) संघटनेचे घटक; (५) पंक्तिघटक; (६) नोकरव्यवस्था (पदांचे वर्गीकरण व वेतनश्रेणी); (७) नोकर व्यवस्था (भरती व लोकसेवा आयोग); (८) नोकर व्यवस्था (प्रशिक्षण व बढती); (९) नोकरव्यवस्था (शिस्त व सेवानिवृत्ती); (१०) अर्थविषयक प्रशासन; (११) प्रशासकीय सत्ता; (१२) प्रशासकीय जबाबदारी; (१३) लोक व लोकप्रशासन; (१४) भारतीय राज्यकारभाराचे स्वरूप.

अठरा वर्षांचा महाविद्यालयीन अध्यापनाचा अनुभव असलेले प्रा. प्रभाकर गंगाधर मुळे हे सध्या वाशीम येथील रा. आ. कला व मि. क. वाणिज्य महाविद्यालयात राज्यशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक आहेत.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १२७ O मूल्य: रु. ५.००

सुभाष भेंडे व रा. का. बर्वे

भारताच्या आर्थिक समस्या

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थशास्त्राने विविध वळणे घेतली व देशापुढे अनेक आर्थिक समस्या उभ्या राहिल्या. काही समस्यांची रूपे बदलत गेली व काहींनी उग्ररूप धारण केले. भारताच्या या समस्यांच्या सर्व अंगोपांगांचा तपशीलवार अभ्यास या पुस्तकांत करण्यात आला आहे.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: ४०७ O मूल्य: रु. १५.००

भास्कर घोंडो कर्वे आणि वि. स. गवाणकर

अभिनव भाषा व्यवसाय

केवळ नेमलेल्या पाठ्यपुस्तकांचे वाचन करून अभ्यासक्रम खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या पचनी पडत नाही. त्यासाठी व्यवसायात्मक स्वाध्यायाची गरज असते. म्हणून इयत्ता पहिली ते चौथीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमांवर आधारित ही छोटी पुस्तके प्रकाशित केली आहेत. केवळ घोकंपट्टी न करता विद्यार्थ्याला स्वत:ची बुद्धी चालविण्याची सवय लागावी हा या पुस्तकांचा हेतु आहे. ज्ञान आणि अनुभव यांची सांगड घालण्यासाठी चित्रे आणि वस्तुनिष्ठ प्रश्न यांचा उपयोग केला आहे. मोठा टाइप आणि सुबक छपाई ही या पुस्तकांची वैशिष्टये.

पहिले पुस्तक–पृष्ठे: ३२	O	मूल्य: रु. १.००
दुसरे पुस्तक–पृष्ठे: ४०	O	मूल्य: रु. १.२५
तिसरे पुस्तक–पृष्ठे: ४८	O	मूल्य: रु. १.५०
चौथे पुस्तक–पृष्ठे: ५६	O	मूल्य: रु. १.७५

विजय ताटके, ग. घों. चित्राव, मो. गौ. चाफेकर

गणित

हे पुस्तक प्राथमिक शाळांतील शिक्षक, माध्यमिक शाळांतील गणित विषयाचे शिक्षक, प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांकरिता असलेल्या ट्रेनिंग कॉलेजातील विद्यार्थी-शिक्षक यांच्याकरिता मुख्यत्वे लिहिले आहे. पुस्तक लिहिताना गणित विषयाच्या अभ्यासक्रमात अगदी आरंभापासूनच्या इयत्तेतच भूमितीचा व बीजगणिताचा काही भाग अंतर्भूत झालेला आहे, या गोष्टींचाही विचार केला आहे.

या पुस्तकातील प्रकरणे: गणितशास्त्राचा इतिहास, गणित शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे, गणित-विषयाच्या अध्यापनाच्या पद्धती, गणिताचा अभ्यासक्रम, अंकगणित, अक्षरांचे गणित (बीजगणित), बीजगणित (पुढे चालू), भूमिती, आलेख, व्यवसाय व लक्षात ठेवण्याजोग्या काही गोष्टी.

या पुस्तकाचे लेखक प्रशिक्षित व प्रदीर्घ अनुभव असलेले लेखक असून त्यांनी या विषयावर लेखनही केले आहे.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १९२ O मूल्य: रु. ४.००

डॉ. अ. का. पाठक

विज्ञानाचे अध्यापन

प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विज्ञान-शिक्षणाने विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची गोडी लागली पाहिजे. विज्ञान व व्यवहार ह्यांमध्ये असलेला घनिष्ट संबंध त्यांच्या लक्षात आला पाहिजे. विज्ञान केवळ वस्तुनिष्ठ नसून जीवननिष्ठ आहे हे त्यांच्या मनावर बिंबले पाहिजे. एवढ्यासाठी विज्ञान-अध्यापन शास्त्रोक्त व प्रभावी झाले पाहिजे. हे उद्दिष्ट ध्यानात ठेवून हे पुस्तक लिहिले आहे.

या पुस्तकातील प्रकरणे: विज्ञान-अध्यापनाचे हेतू, विज्ञानाचे स्थान, विज्ञान-अध्यापन-पद्धती, विज्ञानाचे पाठ, विज्ञान-मंडळ, विज्ञानाच्या अभ्यासक्रमाचे तत्त्वज्ञान, सामान्य विज्ञानाचा आजचा अभ्यासक्रम, विज्ञानाची पाठ्यपुस्तके, दृक्श्राव्य, साधने, प्रयोगशाळा, विज्ञानाचे प्रयोग, विज्ञानाची परीक्षा, विज्ञान-अध्यापक व मूल्यमापन तंत्र.

आकार: डेमी अष्टमांश O पृष्ठे: १५६ O मूल्य: रु. ६.००

प्रा. ना. अ. वझे

व्यवसाय मार्गदर्शन

बहुतेक माध्यमिक शाळांतून इयत्ता दहावीसाठी आठवड्यातून एक तास व्यवसाय मार्गदर्शनासाठी दिला जातो. व्यवसाय मार्गदर्शनाची जबाबदारी उचलणाऱ्या शिक्षकांना हा उपक्रम अधिक उपयुक्त कसा करता येईल, या दृष्टीने यासाठी कोणती साधने वापरावीत, कोणते तंत्र अनुसरावे, या उपक्रमाचे शालेय नियोजन कसे करावे इत्यादि प्रश्नांची चर्चा या पुस्तकात केली आहे.

या पुस्तकातील प्रकरणे: व्यवसाय मार्गदर्शनाची समस्या व भूमिका, व्यावसायिक मार्गदर्शनाची तात्त्विक बैठक, व्यवसाय मार्गदर्शनाचे शालेय नियोजन, व्यवसाय मार्गदर्शनाची साधने, व्यवसाय मार्गदर्शनातील तंत्रे, तुमचे प्रश्न आमची उत्तरे. परिशिष्टे: १: संदर्भ ग्रंथांची सूची, २: व्यवसाय मार्गदर्शनासाठी उपयुक्त असलेल्या व्यवसाय-पत्रिका व इतर प्रकाशने.

पत्रिका व इतर प्रकाशने.

आकार: डेमी अष्टमांश पृष्ठे: ११५ O मूल्य : O रु. ४.००

भेण्डे, बर्वे व शेळके

अर्थशास्त्र परिचय

महाराष्ट्रातील उच्च माध्यमिक १२ व्या इयत्तेच्या अभ्यासानुसार हे पुस्तक लिहिले आहे व त्याला महाराष्ट्र राज्यात पाठ्यपुस्तक म्हणून मंजुरी मिळालेली आहे.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठे १८४ O मूल्यः रु. ८.३०

नीरा देसाई व धैर्यबाळा व्होरा

आधुनिक भारत

नवाभारत कोणत्या मार्गाने जात आहे हे नीट समजून घेतले तरच भावी काळात आजची तरुण पिढी आपली वाट योग्य रीतीने उचलू शकेल हे उद्दिष्ट ध्यानात ठेवून इ. स. १८१८ ते १९६६ या कालखंडाचा हा इतिहास तयार केला आहे.

या पुस्तकाच्या पहिल्या विभागात राजकीय घटनात्मक विकासाचा परिचय करून देण्यात आला आहे. दुसऱ्या विभागात सामाजिक व सांस्कृतिक विकासाची ओळख करून दिलेली आहे. व तिसऱ्या विभागात आर्थिक विकासांची रूपरेषा दिलेली आहे.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठेः २८४ O मूल्यः रु. १२.००

सीताराम शास्त्री

इतिहास, नागरिकशास्त्र व शासनपद्धती इ. ४ थी करिता

गोमंतकांतील प्राथमिक शाळांच्या अभ्यासक्रमानुसार हे पुस्तक लिहिले आहे. यातील इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय सर्व प्राथमिक शाळांतील मुलांना या विषयावरील पुरवणी वाचन म्हणून उपयुक्त वाटतील.

आकारः डेमी अष्टमांश O पृष्ठे ७८ O मूल्यः रु. ~~१.३०~~
2 रु 10

एच्. जे. फरिअस व दि. ग. खरे

मराठी प्रवेशिका (महाराष्ट्र आवृत्ती)

महाराष्ट्रातील इंग्रजीत माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या अभ्यासाकरिता प्रथम पुस्तक. जरूर तेथे विद्यार्थ्यांकरिता व शिक्षकाकरिता इंग्रजीत मार्गदर्शन केले आहे. तसेच अक्षर ओळख करून दिल्यानंतर बाराखडी, व जोडाक्षरांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने परिचय करून देण्यात आला आहे.

मराठी प्रवेशिका पुस्तक पहिले

मराठी प्रवेशिका पुस्तक दुसरे

इंग्रजी माध्यमाच्या बऱ्याच शाळांतून बहुसंख्य विद्यार्थी अमराठी असतात. अशा विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्याकरिता वरील पुस्तके तयार केली आहेत. यात दोन वर्षांचा अभ्यासक्रम आला आहे व हा अभ्यास पुरा केल्यानंतर मुलांना मराठी लिहिता, वाचता व बोलता येईल.

आकार: डेमी अष्टमांश O पुस्तक १ ले पृष्ठे: ६४ O मूल्य रु. ~~२.५०~~ 3 रु 05
O पुस्तक २ रे पृष्ठे: ५६ O मूल्य रु. ~~२.५०~~ 3 रु 05

सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.

१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर,
मुंबई–४०० ०१४

दूरध्वनि : ८८२०२३०   तारेचा पत्ता : बुकमार्क

●

एफ्–६, बँक ऑफ बरोडा बिल्डिंग, पार्लमेन्ट स्ट्रीट,
नवी दिल्ली–११० ००१

दूरध्वनि : ३१०१४१ □ ३१००८२

धी बुक सेन्टर लि. (मुद्रणालय विभाग) मुंबई–४०० ०२२